प्रकरण – तीन

# समाजजीवनशास्त्र, पाठ्यपुस्तक, परीक्षा पद्धती आणि मार्गदर्शक

# प्रकरण – तीन

## समाजजीवनशास्त्र, पाठ्यपुस्तक, परीक्षा पध्दती आणि मार्गदर्शक

३.१ प्रस्तावना

३.२ समाजजीवनशास्त्र

१. इयत्ता दहावी – समाजशास्त्र विषय

२. समाजशास्त्र विषय – गुण विभागणी

३.३ पाठ्यपुस्तक

१. पाठ्यपुस्तकांचे प्रकार

२. पाठ्यपुस्तक आणि विद्यार्थी

३. पाठ्यपुस्तक निर्मिती – काही प्रक्रिया

४. राष्ट्रीय पाठ्यपुस्तक मंडळ

५. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ

६. इयत्ता दहावी – इतिहास पाठ्यपुस्तक.

३.४ परीक्षा पध्दती

१. परीक्षा पध्दतीची उद्दिष्टये

२. परीक्षा प्रकार

३. इतिहासाची परीक्षा

४. इतिहास प्रश्नपत्रिका – घटकानुसार गुण विभागणी

५. इतिहास प्रश्नपत्रिका – प्रश्नप्रकारानुसार गुणविभागणी
६. इतिहास प्रश्नपत्रिकेचा आराखडा
७. एस. एस. सी. परीक्षा इतिहास प्रश्नपत्रिका, एप्रील १९९०

३.५ मार्गदर्शक

३.६ समारोप

=-=-=-=-=-=-=

# प्रकरण-तीन

## समाजजीवन शास्त्र, पाठ्यपुस्तक, परीक्षा पध्दती आणि मार्गदर्शक


### ३.१ प्रस्तावना :-

मागील प्रकरण दोनमध्ये प्रस्तुत संशोधनाच्या संबंधी संशोधनाची उद्दिष्टये, कार्यपध्दती, निष्कर्ष यांचे विवेचन केले आहे. प्रस्तुत प्रकरणाच्या नांवावरुनच या प्रकरणाचा उद्देश प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असलेली सैध्दांतिक पार्श्वभूमी विषद करणे हा आहे हे स्पष्ट होते. 'माध्यमिक शाळेतील इयत्ता दहावींच्या इतिहास विषयाच्या अध्ययनअध्यापनात इतिहास पाठ्यपुस्तक व मार्गदर्शकाच्या उपयोगाचा चिकित्सक अभ्यास' हा संशोधनाचा विषय असल्याने सहाजिकच समाजजीवन शास्त्राचे स्वरुप, त्यात अंतर्भूत होणारे विषय, विषयाच्या उद्दिष्टानुसार तयार केलेले इयत्ता दहावीचे इतिहासाचे पाठ्यपुस्तक, इतिहासाची परीक्षा, इतिहासाची प्रश्नपत्रिका आणि या सर्वांच्या अनुषंगाने मार्गदर्शकाचे स्वरुप यासर्व गोष्टींचा ऊहापोह करणे आवश्यक आहे. तोच प्रस्तुत प्रकरणाचा उद्देश आहे.

### ३.२ समाजजीवन शास्त्र [Social Studies ]

मानवी समाजाची घडण व विकास, तसेच सामाजिक गटाचा एक घटक म्हणून मनुष्य – यासंबंधी जो विषय प्रत्यक्ष रीतीने माहिती देतो तो विषय म्हणजे समाजजीवन शास्त्र किंवा नैसर्गिक व सामाजिक परिस्थितीशी मानवाची जी प्रतिक्रिया होते ती प्रतिक्रिया आणि मानवी संबंध दाखविणारे शास्त्र म्हणजे समाजजीवन शास्त्र असे म्हणता येते. दुसऱ्या शब्दात हेच आपणाला असे सांगता येईल की, मनुष्य आणि परिस्थिती, परिस्थितीबाबत आणि इतर मानवी समूहांबाबत प्रतिक्रिया जो विषय दाखविती तो विषय म्हणजे समाजजीवन शास्त्र होय.

ह्या विषयाचा केंद्रबिंदू म्हणजे सामाजिक परिस्थितीशी निगडीत झालेला मानव हा होय. हा विषय मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करतो म्हणून तो सर्वस्पर्शी विशाल असा विषय आहे. ह्या "समाजजीवनशास्त्र" किंवा समाजशास्त्र विषयाचा संबंध इतर कोणत्या विषयांशी येतो ते पुढील आकृतीवरुन स्पष्ट होईल.




उपरिनिर्दिष्ट विषयातील जी माहिती मानवाच्या सामाजिक प्रगतीला उपयुक्त होईल तेवढीच घेऊन ह्या विविध विषयांतील माहितीला एकात्मता [ Integration ] आणली की, समाजजीवन शास्त्र किंवा समाजशास्त्र हा विषय बनतो.


भारतात माध्यमिक अभ्यासक्रमासंबंधी मुदलियार आयोगाने [ Secondary Education Commission - 1952 ] पुढील प्रमाणे मत व्यक्त केले आहे. "माध्यमिक अभ्यासक्रमात विषयांची फारच गर्दी झाली आहे. अशी तक्रार ऐकू येते. पण स्वतंत्रपणे – अलगपणे–शिकवावयाच्या

विषयांची संख्या वाढत आहे, आणि तसे करीत असताना विषयातील अंगभूत परस्पर सहसंबंध [ Correlation ] याकडे दुर्लक्ष होत आहे.. वास्तव सामाजिक परिस्थिती [ Social environment ] आणि मानवी संबंध [ human relations ] यांना केंद्रभूत मानून त्यांच्या भोवती इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र आणि अर्थशास्त्र हे विषय "समाजजीवन शास्त्र" किंवा "सामाजिक अभ्यास" म्हणून शिकवावेत. वरील विषय पाणबंद स्वरुपात [ Water - tight Compartments ] अलग रीतीने शिकविण्यापेक्षा परस्पर संबंधित [ Coordination ] व संकलित स्वरुपात शिकविणे योग्य होईल. "

१.१ <u>इयत्ता दहावी - समाजशास्त्र विषय</u> :-

मुदलियार आयोगाने भारताच्या शिक्षण पध्दतीत "समाजशास्त्र" ह्या विषयाला स्थान मिळवून दिले. माध्यमिक अभ्यासक्रमात समाजशास्त्र हा एक नवीन विषय समाविष्ट झालेला आहे. इतिहास, भूगोल व नागरिशास्त्र हे तीन विषय एकत्रीत या समाजशास्त्र विषयात समाविष्ट आहेत. पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार जून १९८२ पासून इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र विषयाची नवीन पाठयपुस्तके इयत्ता आठवी पासून निर्धारित करण्यात आली. जून १९८४ ला इतिहासाचे नवीन पाठयपुस्तक इयत्ता दहावीला तयार करण्यात आले.

२ <u>समाजशास्त्र विषय :- गुण विभागणी</u> -



शाळांमधून इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र हे विषय स्वतंत्र रीतीने शिकविले जातात. माध्यमिक शालांत परीक्षेच्या [एस.एस.सी. ] परीक्षेत प्रश्नपत्रिकेचे नांव "समाजशास्त्र" हे असले तरी इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र यावर अलग-अलग प्रश्न विचारले जातात त्यापैकी इतिहास नागरिकशास्त्र हा एक साठ गुणांचा अडीच तासाचा पेपर असतो. त्यातही इतिहास चाळीस गुण आणि नागरिकशास्त्राला वीस गुण असतात. भूगोलाचा दुसरा स्वतंत्र पेपर चाळीस गुणाचा असतो. वरील आकृतीच्या साहाय्याने ही गोष्ट अधिक स्पष्ट होईल.

माध्यमिक शाळांच्या वेळापत्रकात समाजशास्त्र - विषयाला आठवड्यातून पस्तीस मिनीटांच्या पांच तासिका देण्यात आलेल्या असतात. त्यापैकी इतिहासाला दोन, भूगोलाला दोन व नागरिकशास्त्राला एक असते.

## ३.३ पाठ्यपुस्तक :-

पाठ्य म्हणजे शिकविण्यास आवश्यक, नुसते वाचनीय नव्हे. विशिष्ट योग्यता शिक्षणातून प्राप्त झाल्याखेरीज ज्यांचे स्वयमेव आकलन कठीण जाते, असे पुस्तक म्हणजे पाठ्यपुस्तक होय. या संदर्भात "शिक्षक"या शब्दाने माणूस शिक्षक एवढाच अर्थ विवक्षित नाही. विषयाचा उलगडा करण्यास आवश्यक असलेली साधन सामुग्रीही शिक्षक या शब्दात अभिप्रेत आहे. विद्यालयातील पाठ्यपुस्तकांचा दर्जा क्रमाने लावावा लागतो. याचे कारण कोणत्याही विद्यार्थ्याला किंवा विद्यार्थिनीला ज्ञानसाधना क्रमानेच करता येते. उदाहरणार्थ प्राथमिक,माध्यमिक, उच्च असा शिक्षणक्रम असतो. याचे कारण प्राथमिक [एलिमेंटरी] शिक्षण झाल्याशिवाय त्या-त्या विषयाचे अधिक विस्तृत, गुंतागुंतीचे, वरच्या पायरीचे ज्ञान, मन किंवा बुध्दी ग्रहण करु शकत नाही. याकरिता पुस्तकांचा क्रम हा त्याठिकाणी विवक्षित असतो. बहुतेक विषय असे असतात की, त्यांच्यामध्ये क्रमाक्रमानेच

प्रवेश करता येतो व प्रावीण्य मिळविता येते. उदाहरणार्थ गणित, विज्ञान, तंत्रविद्या, व्याकरण इत्यादी विषय असे आहेत. इतिहास, भूगोल, भूवर्णन, ललित-साहित्य इत्यादिकांच्या विषयांत क्रमाने अपरिहार्यपणे जाण्याची आवश्यकता काही विचक्षण विद्यार्थ्यांना नसते, हे ही या संदर्भात ध्यानात ठेवावे लागते, परंतु सर्वसाधारणपणे त्यातही ज्ञानाचा क्रमविकास हा सिध्दांत गृहीत धरावाच लागतो. उदाहरणार्थ कविता, प्रतिभा संपन्न विद्यार्थ्याला कवितेचा आस्वाद घेण्याकरिता क्वचित प्रसंगी क्रमाने वाचन करण्याची आवश्यकता पडत नाही.

## १ पाठ्यपुस्तकांचे प्रकार :-

पाठ्यपुस्तकांचे दोन प्रकार आहेत. वरील प्रमाणे ज्ञान विकासक्रम लक्षात घेऊन तयार केलेली पाठ्यपुस्तके जशी आवश्यक असतात. त्याप्रमाणे तशा प्रकारचा क्रम लक्षात न घेता शास्त्रकार, साहित्यकार, संशोधक, प्रतिभाशाली ललित लेखक स्वतःचे साहित्य निर्माण करीत असतात. त्यांचीही स्वतंत्र पुस्तके पाठ्यपुस्तकांत अंतर्भूत करावी लागतात. त्यांच्यातही ज्ञानविकासक्रम लक्षात घ्यावा लागतो. उदाहरणार्थ उच्च अभ्यासक्रमात शांकरभाष्य, ज्ञानेश्वरी, प्लेटोचे रिपब्लिक, मॅकीऑव्हलीचे प्रिन्स, न्यूटनचे प्रिन्सिपिआ हे पुस्तक, मिल्टनचे पॅरडाइस लॉस्ट हे काव्य, शेक्सपिअरची नाटके, केन्सचे जनरल थीअरी ऑफ एम्प्लॉयमेंट, इंटरेस्ट अँड मनी इत्यादी अंतर्भूत असतात.

शिक्षण पध्दतीत पाठ्यपुस्तकांची गरज भासते, याचे कारण अध्ययन-अध्यापनाचे ते एक आवश्यक साधन आहे. पुस्तकाविना शिक्षण देता येईल काय, याचे प्रयोग अमेरिकेत करण्यात आले. तथापि पुस्तकांचे साहाय्य अपरिहार्य आहे असाच निष्कर्ष त्या प्रयोगांतून काढण्यात आला.

सॉक्रेटिस, प्लेटो यांच्यासारखी स्वतंत्र प्रतिभेची माणसे पाठ्य-पुस्तकांना कमी लेखीत. पाठ्यपुस्तके स्मरणशक्ती दुबळी बनवितात व

भिन्न भिन्न बौध्दिक पात्रतेच्या विद्यार्थ्यांची ब्रूज ती राखत नाहीत, असा प्लटोचा आरोप होता. रुसोनेही पाठ्यपुस्तकांना गौण स्थानच दिले आहे. शाब्दिक ज्ञानावर आणि आप्तवाक्य प्रामाण्यावर भर देणाऱ्या प्रवृत्तीविरुध्द ही प्रतिक्रीया होती. पाठ्यपुस्तकांच्या सुधारणेचा पहिला प्रयत्न कोमिनिअस [१५९२-१६७०] याने केला. त्याने पहिले सक्रिय व सटीप पाठ्यपुस्तक तयार केले. बालकांना प्रत्यक्ष अनुभवाने म्हणजे वस्तुपाठाने शिकविण्याची पध्दत पेस्टालोत्सीने [१७४६-१८२७] ला सुरु केली. त्यामुळे मुलांसाठी तयार करावयाच्या पाठ्यपुस्तकांत क्रांती झाली. म्हणूनच आधुनिक पाठ्यपुस्तकांच्या जनकत्वाचा मान त्याला दिला जातो. एकोणिसाव्या शतकात बहुतेक पाश्चात्य देशांत "राष्ट्रीय शिक्षणपध्दती" सुरु झाली आणि मुद्रणकलेचाही विकास झाला. त्यामुळे पाठ्यपुस्तकांचा प्रसार मोठ्याप्रमाणावर झाला, पण अध्यापनात घोकं - पट्टीला अतिरिक्त महत्व आले की, पाठ्यपुस्तकां विरुध्द प्रतिक्रिया व्यक्त होते. अमेरिकेत प्रगमनशील शिक्षणाच्या चळवळीत व भारतातील मूलोद्योग शिक्षणात कृतीला आणि क्रियाशिलतेला महत्व येताच पाठ्य-पुस्तकांना गौणत्व आले. वस्तुत: ही प्रतिक्रीया पुस्तकी शिक्षण पध्दती-विरुध्द आहे, असे म्हणता येईल.

## ०२ पाठ्यपुस्तक आणि विद्यार्थी :-

पाठ्यपुस्तक कोणत्या वयाच्या विद्यार्थ्यांसाठी आहे व ते कोणत्या विषयाचे आहे, यावरुन त्याचे प्रकार व उपयोग निश्चित होतात. विषयाची क्रमबध्द मांडणी हा शालेय पाठ्यपुस्तकांचा महत्वाचा गुण मानला जातो. काही पाठ्यपुस्तके अभ्यासाच्या दिशा दाखविणारी व स्वतंत्रपणे अभ्यासाला साहाय्य करणारी असतात. प्रौढ विद्यार्थ्यांच्या बाबतीत पाठ्यपुस्तक हे शिक्षक आणि मार्गदर्शक या दोन्ही भूमिका पार पाडू शकते. पाठ्यपुस्तकामुळे विद्यार्थी स्वत:च्या गतीने व सवडीने

अभ्यास करू शकतात. झालेल्या अभ्यासाच्या उजळणी करण्यासाठी त्याचा आढावा घेण्यासाठी, स्मृतीला चालना व उजळणी देण्यासाठी पाठ्यपुस्तकांचा उपयोग होतो.

## ३ पाठ्यपुस्तक निर्मिती – काही प्रक्रिया :-

पाठ्यपुस्तक निर्मितीमध्ये सामान्यत: खालील प्रक्रियांचा समावेश होतो.

[१] अभ्यासक्रमामध्ये अंतर्भूत असलेल्या संकल्पनांची निश्चिती करणे आणि त्यांच्या स्पष्टीकरणार्थ योग्य टिपणे करणे.

[२] लेखक आणि मूल्यमापकांसाठी प्रशिक्षणवर्ग घेणे.

[३] एकाच स्तरावरील विविध विषयांच्या पाठ्यपुस्तकांचा दर्जा समान राहील, याची यंत्रणा तयार करणे.

[४] जगभर पाठ्यपुस्तकांची निर्मिती चालू असते, त्यांचे परिशीलन करणे व नव्या संशोधनांची दखल घेणे.

[५] नवी पाठ्यपुस्तके वापरात येऊ लागल्यावर ती शिकविणाऱ्या शिक्षकांशी वरचेवर संपर्क साधून त्यांच्या अडचणी समजावून घेणे, पाठ्यपुस्तकांमध्ये योग्य त्या सुधारणा करणे व अशा तऱ्हेने पाठ्यपुस्तकांचे निरंतर मूल्यमापन करीत राहणे.

[६] पाठ्यपुस्तकाच्या निर्मितीस आवश्यक अशा साहित्याचा राज्य व केंद्र स्तरावर संग्रह करणे.

इतिहास, भूगोल, शास्त्र या विषयातील मूलभूत कल्पना वरचेवर बदलत नाहीत. त्यामुळे विषयाच्या मांडणीत जो काही बदल होईल, तेवढाच बदल पाठ्यपुस्तकात होतो. राज्यसत्ता क्रांतीकारकपणे बदलल्यास इतिहासाच्या दृष्टीकोणातही बदल होतो.

## २.४ राष्ट्रीय पाठ्यपुस्तक मंडळ :-

भारतात १९६८ मध्ये शिक्षण विषयक राष्ट्रीय धोरण जाहीर झाल्यानंतर राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर पाठ्यपुस्तकांची निर्मिती व संशोधन यासाठी मंडळे नेमण्यात आली. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण मंडळ यांच्या अंतर्गत "राष्ट्रीय पाठ्यपुस्तक मंडळ" १९६९ मध्ये नेमण्यात आले. त्या मंडळाच्या सभेत दूरगामी धोरण ठरविण्यात आले. त्यातील महत्त्वाची सूत्रे अशी.

[१] पाठ्यपुस्तक मूल्यमापनाची यंत्रणा पुरविण्यात आली.

[२] पाठ्यपुस्तक निर्मितीमध्ये प्रत्यक्ष शिकविणाऱ्या शिक्षकांचे सहकार्य घ्यावे.

[३] विषयावर शिक्षकांची मंडळे स्थापन करण्यात आली.

[४] पाठ्यपुस्तक लेखकासाठी कृतीसत्रे घेण्याचे ठरले.

## २.५ महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ :-

मुदलियार शिक्षण आयोगाच्या [१९५२] शिफारशी प्रमाणे महाराष्ट्रात "महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ" २७ जानेवारी १९६७ रोजी स्थापन झाले. शालेय विद्यार्थ्यांना रास्त दरात दर्जेदार पाठ्यपुस्तके मिळावीत, हा मंडळाचा प्रमुख हेतु आहे. शालेय अभ्यासक्रमाची पुनर्रचना झाल्यामुळे या मंडळाने प्रसिध्द केलेली पाठ्यपुस्तके १९७१-७२ या शालेय वर्षापासून सर्व महाराष्ट्रभर वापरण्यात येऊ लागली. शालेय विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके, शिक्षकांसाठी हस्तपुस्तके व विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय पुस्तके यांची निर्मिती करणे, शालेय अध्ययन आणि अध्यापन प्रगत होण्याच्या दृष्टीने उपयुक्त असे शैक्षणिक साहित्य तयार करणे, अशा प्रकारे तयार झालेल्या पुस्तकांची

आणि साहित्याची छपाई व विक्री करणे, प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरांवरील अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके यांचे संशोधन करणे इत्यादी उद्दिष्टये मंडळाने आपल्यासमोर ठेवली आहेत. पाठ्यपुस्तका व्यतिरिक्त मंडळाने ध्वनिमुद्रिका, तक्ते इत्यादी शैक्षणिक साहित्यही तयार केले आहे.

६ इयत्ता दहावी - इतिहास पाठ्यपुस्तक :-

प्रस्तुत पुस्तक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या धोरणानुसार अभ्यास मंडळाच्या मार्गदर्शनाखाली लेखन मंडळाने तयार केले आहे.

अभ्यास मंडळ सदस्य :-

श्री. मु. ज्ञा. भोसले [आमंत्रक], श्री. गो. बा. सराफ, डॉ. प्र. र. देव, प्रा. मनोहर रा. वकील, श्रीमती एस. हुडा, श्रीमती शारदा गौर, श्रीमती पद्मा घुगले, श्री. राजेंद्रसिंह ठाकूर.

लेखक मंडळ सदस्य :-

श्रीमती शकुंतला अहिरे, श्री. गो. हु. महाजन, श्री. सा. श्री. काचोळे, श्री. ह. म. होले.

"महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ व अपर-शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य, पुणेचे अध्यक्ष पं. तु. महाजन यांनी प्रस्तुत पुस्तकाच्या प्रस्तावनेत पाठ्यपुस्तकाचे लेखन करण्यामागे कोणता नवा दृष्टीकोन आहे हे नमूद केले आहे. ते प्रस्तावनेत म्हणतात-"महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने

डॉ. ईश्वरभाई पटेल समीक्षण समितीच्या शिफारशीनुसार इयत्ता आठवी ते दहावीच्या अभ्यासक्रमाचा व त्यांच्या उद्दिष्टांचा नव्याने विचार करुन, समाजातील सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांच्या गरजा, त्यांचा वयोगट, त्यांची आकलनशक्ती लक्षात घेऊन अभ्यासक्रमाची पुनर्रचना केली आहे. पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार जून १९८२ पासून इयत्ता आठवी, जून १९८३ इयत्ता नववी, या क्रमाने नवीन पाठ्यपुस्तके निर्धारित करण्यात आली. त्यानुसार इयत्ता दहावीचे सदर पाठ्यपुस्तक तयार करण्यात आले आहे.

भारतातील लोकशाही समाजवादास पोषक अशी मनोवृत्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, गतिमान जीवनाची मूल्ये आत्मसात करण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळावी, त्यांचे जीवन पुगत विचार - मूल्यांनी समृध्द व्हावे, त्यांची अस्मिता जागी व्हावी व त्यांच्या निर्भय-वृत्ती वाढीस लागाव्यात, त्यांच्या जीवनाची परिणती सामाजिक व सांस्कृतिक जीवन समृध्द करण्यात व्हावी, तसेच भूतकाळाच्या पार्श्वभूमीवर त्यांना वर्तमानकाळातील घडामोडींचे आकलन व्हावे व त्याव्दारे भवितव्य उज्वल करण्याची जाण निर्माण व्हावी, त्यातून त्यांना निकोप राष्ट्रवाद, आंतरराष्ट्रीय सामंजस्य, सर्वधर्मसमभाव या मूल्यांची प्रेरणा मिळावी व तो सुजाण नागरिक बनावा हा इतिहास शिक्षणाचा नवा दृष्टीकोन पुढे ठेवून या पाठ्यपुस्तकाचे लेखन करण्यात आले आहे."

इतिहास शिक्षणाचा हा नवा दृष्टीकोन व इतिहास अभ्यास-क्रमाची उद्दिष्टये लक्षात घेऊन इयत्ता दहावीच्या अभ्यासक्रमानुसार या पाठ्यपुस्तकातील घटकांचे लेखन करताना पहिल्या व दुसऱ्या महायुध्दातून देशातील उद्योगिकरणाला मिळालेली रचना, साम्राज्यशाहीच्या विरोधात लोकशाही समाजवादी विचार पुणालीसाठी जागतिक संदर्भात भारताने

केलेले कार्य, जगाला दुसऱ्या महायुध्दाच्या खाईत लोटणाऱ्या फॅसिस्ट व नाझी या हुकूमशाही प्रवृत्तींना पंडित जवाहरलाल नेहरूंनी आपल्या देशात घातलेला पायबंद, राष्ट्रीय चळवळीने दिलेल्या निर्भयता, त्याग सेवा, श्रमप्रतिष्ठा, राष्ट्रप्रेम इत्यादी निष्ठा, आंतरराष्ट्रीय सामंजस्य, जागतिक शांतता, विश्वबंधुता, सहकार्य इत्यादी मूल्ये यावर विशेष भर दिला आहे. तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्षेत्रांमध्ये घडणाऱ्या घटनांची दखल घेऊन इतर राष्ट्रे आपल्या प्रगतीची वाटचाल करतात, त्यातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारण परस्परांना पूरक ठरत असते ही दृष्टी पाठ्यपुस्तकाचे लेखन करताना सतत ठेवली आहे."

प्रस्तुत इयत्ता दहावीच्या इतिहास पाठ्यपुस्तकात समाविष्ठ केलेल्या पाठांची नांवे, त्यांचा क्रमांक व पान क्रमांक याची अनुक्रमणिका पुढील प्रमाणे आहे.

## अ नु क्र म णि का


| क्रमांक | पाठाचे नांव - | पाठ क्रमांक |
|---|---|---|
| [१] | पहिले महायुध्द .. | १ |
| [२] | फॅसिझमचा उदय, दुसरे महायुध्द व संयुक्त राष्ट्रे | १० |
| [३] | भारताचा स्वातंत्र्य लढा - गांधीयुग | २३ |
| [४] | सविनय कायदेभंग - सत्याग्रह पर्व | ३३ |
| [५] | सशस्त्र क्रांतिपर्व | ४६ |
| [६] | भारत छोडो आंदोलन | ५३ |
| [७] | भारताची स्वातंत्र्यप्राप्ती | ६१ |
| [८] | स्वातंत्र्योत्तर भारत | ६८ |
| [९] | नियोजनाच्या मार्गाने भारताचा आर्थिक विकास | ७५ |
| [१०] | भारताचे परराष्ट्रीय धोरण | ८४ |

३.४ <u>परीक्षा पध्दती</u> :-

विद्यार्थ्यांनी कितपत ज्ञान संपादित केले, संपादित ज्ञानाचे उपयोजन त्यांना कितपत करता येते, प्राप्त केलेल्या क्रियाकौशल्यांचा त्याना किती परिणामकारकरीतीने उपयोग करता येतो किंवा त्यांनी प्राप्त केलेल्या क्रियाकौशल्यांची गुणवत्ता किती आहे व तिचा किती परिणामकारक रीतीने उपयोग करता येतो, इत्यादी प्रश्नांची उत्तरे ज्या प्रक्रियेतुन मिळतात, तिला शैक्षणिक परीक्षा असे स्थूलमानाने म्हणता येईल. नियत कालावधीत अध्ययन-अध्यापन पुरे झाल्यानंतर विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाते. शिक्षण शास्त्रातील आधुनिक कल्पनांनुसार परीक्षा पध्दतीत शिकविणा-याची अभ्यासातील प्रगती, शिकविणा-याची अध्यापनपध्दती, अभ्यासक्रमाची योग्यायोग्यता, शिकणा-याच्या अभ्यासाच्या सवयी, ज्याठिकाणी अध्ययन-अध्यापन चालते, तेथील शिक्षणानुकूल वातावरण तसेच ज्या प्रशासनाखाली शिक्षण चालते, त्याची परिणामकारता यासारख्या सर्वच गोष्टींची गुणवत्ता जोखली जाते.

३.१ <u>परीक्षा पध्दतीची उद्दिष्टये</u> :-

विद्यार्थ्यांची अभ्यासातील प्रगती तपासणे, हा परीक्षेचा प्रमुख हेतु असतो, परंतु त्याच बरोबर विद्यार्थ्यांना अभ्यासाची प्रेरणा लाभावी, पुष्कळ गुण आणि वरची श्रेणी मिळविण्यास त्याने प्रवृत्त व्हावे, अपयश आल्यास असे अपयश का आले, याचे त्याने आत्मसंशोधन करावे इत्यादी हेतु परीक्षेतुन साध्य होतात.

अध्यापनातील गुणदोष लक्षात येण्यासाठी परीक्षा पध्दतीचा उपयोग होतो. मुलांची बौध्दिक कुवत आणि पूर्वतयारी यांचा विचार करुन अध्यापन करावे लागते. त्याच प्रमाणे सर्वच विषयासाठी एकच अध्यापन पध्दती वापरुन चालत नाही. तेंव्हा अध्यापन परिणामकारक झाले की नाही हे परीक्षेच्या साहाय्याने कळू शकते.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि व्यावसायिक मार्गदर्शन करणे, हा परीक्षेचा तिसरा हेतू. विद्यार्थ्यांची बौध्दिक कुवत, कल, अभिरुची इत्यादी लक्षांत घेऊन त्यांनी कोणता अभ्यासक्रम निवडावा, कोणता व्यवसाय निवडावा याचे मार्गदर्शन चाचणी घेऊन करता येते.

विशिष्ट अभ्यासक्रमासाठी निवड करणे हा परीक्षांचा चौथा हेतू होय. उच्च अभ्यासक्रमासाठी जागा कमी आणि विद्यार्थी जास्त अशी स्थिती असते. तेव्हा परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांची निवड करणे भाग असते. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देणे, हा परीक्षा पध्दतीचाच एक घटक आहे.

### २.२ परीक्षा प्रकार :-

परीक्षेचा सर्वात जुना प्रकार म्हणजे तोंडी परीक्षा होय. पाढे म्हणावयास सांगणे, कविता पाठ म्हणून घेणे, वाचन करावयास सांगणे, प्रश्न विचारणे इत्यादी मार्गांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीची चाचणी घेतली जाते. उच्च परीक्षांच्या बाबतीत या तोंडी परीक्षेला परीक्षक व विद्यार्थी यामधील चर्चेचे स्वरुप येते. मुलाखत ही एक प्रकारे तोंडी परीक्षाच असते. अनेक व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी नवीन विद्यार्थी निवडताना मुलाखत घेतात. तोंडी परीक्षेतील गुण परीक्षकांच्या व्यक्तिगत दृष्टीकोनावर अवलंबून असल्याने ही पध्दत तितकीशी विश्वसनीय ठरत नाही.

मोठ्या प्रमाणावर परीक्षा घेण्यास लेखी परीक्षा उपयुक्त असते. त्यातही निबंधवजा परीक्षा आणि वस्तुनिष्ठ परीक्षा असे प्रकार आहेत. प्रश्नपत्रिका काढणे, तिच्या पुरेशा प्रती तयार करणे, परीक्षेच्या स्थानी त्या पाठविणे, त्या योग्य प्रकारे सुरक्षित ठेवणे व योग्य वेळी विद्यार्थ्यांना वाटणे, विद्यार्थ्यांच्या उत्तर पत्रिका एकत्र करणे, त्या तपासण्यासाठी पाठविणे व त्या तपासून आल्यानंतर निकालपत्रक तयार करणे इत्यादी गोष्टी लेखी परीक्षांच्या बाबतीत कराव्या लागतात.

9019
A

अनेक तांत्रिक, वैज्ञानिक विषयांत काही क्रियाकौशल्ये संपादणे हा हेतू असतो. उदाहरणार्थ सुतारकामात दिलेल्या नमुन्याप्रमाणे वस्तू तयार करणे, वास्तुशिल्पात नमुने तयार करणे, विज्ञानात विविध प्रकारचे शास्त्रीय प्रयोग करणे, अशा विषयासाठी लेखी आणि तोंडी परीक्षां - शिवाय प्रयोगरूप [प्रॅक्टिकल] परीक्षा घेतल्या जातात.

लेखी, तोंडी आणि प्रयोगरूप परीक्षा प्रमाणे कृतिसत्रांतील किंवा चर्चासत्रातील सहभाग निबंध वाचन, प्रबंध लेखन इत्यादी मार्गांनीही परीक्षा घेतली जाते.

३ इतिहासाची परीक्षा :-

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळा मार्फत घेतल्या जाणाऱ्या समाजशास्त्र [Social - Science] या विषयांतर्गत इतिहास, नागरिकशास्त्राची अडीच तासाची ६० गुणाची एकच प्रश्नपत्रिका असते, तर दोन तासाची ४० गुणाची भूगोलाची प्रश्नपत्रिका असते. इतिहास नागरीकशास्त्राची प्रश्न पत्रिका ६० गुणाची असून ४० गुण इतिहासाला, २० गुण नागरिकशास्त्राला असतात.

४ इतिहास प्रश्नपत्रिका - घटकानुसार गुण विभागणी :-

इतिहास, नागरिकशास्त्राच्या प्रश्न पत्रिकेत एकूण आठ प्रश्न असून प्रश्न क्रमांक एक ते पांच इतिहास विषयाचे असतात. तर प्रश्न क्रमांक सहा, सात व आठ हे नागरिकशास्त्र विषयाचे असतात. इतिहास विषयाची प्रश्नपत्रिका ही घटकानुसार गुण विभागणी विचारात घेऊनच काढलेली असते. प्रश्न पत्रिकेतील घटकानुसार गुण विभागणी ही पुढील सारणी क्रमांक ३.१ मध्ये दिली आहे.

## सारणी क्रमांक ३.१

## इतिहास प्रश्न पत्रिका घटकानुसार गुण विभागणी

| अ.नं. | घटक | गुण | वैकल्पिक प्रश्नासह गुण |
|---|---|---|---|
| [१] | आंतरराष्ट्रीय इतिहास | | |
| | अ] भारत व पहिले महायुध्द | ४ | ७ |
| | ब] फॅसिस्ट व नाझीवादाचा उदय | ४ | ७ |
| | क] भारत व दुसरे महायुध्द | ४ | ७ |
| [२] | भारतीय स्वातंत्र्य चळवळ [१९२० ते - १९४२] | १४ | २४.५ [२४ किंवा २५ ] |
| [३] | भारतीय स्वातंत्र्य चळवळ अंतिम टप्पा [१९४२ ते १९५०] | १० | १७.५ [१७ किंवा १८] |
| [४] | अ] नियोजनाद्वारे भारताची आर्थिक - प्रगती. | २ | ३.५ [३ किंवा ४] |
| | ब] भारताचे परराष्ट्रीय धोरण | २ | ३.५ [३ किंवा ४] |
| | एकुण | ४० | ७०.०० |

३.५ इतिहास प्रश्न पत्रिका- प्रश्न प्रकारानुसार गुण विभागणी :-

इतिहास विषयाची प्रश्न पत्रिका ही जशी घटकानुसार गुण - विभागणी विचारात घेऊन काढली जाते, तशीच प्रश्नप्रकारांनुसार गुण विभागणी विचारात घेऊन काढली जाते. प्रश्न पत्रिकेतील गुण विभागणी

ही प्रश्न प्रकारांनुसार कशी केली जाते याचा तपशिल पुढील सारणी क्रमांक ३.२ मध्ये दिला आहे.

सारणी क्रमांक ३.२

इतिहास प्रश्न पत्रिका – प्रश्न प्रकारांनुसार गुण विभागणी –

| अ. नं. | प्रश्न प्रकार | गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|
| [१] | वस्तुनिष्ठ प्रश्न | ८ | २० |
| [२] | लघुत्तरी प्रश्न | १६ | ४० |
| [३] | दीर्घोत्तरी प्रश्न | १६ | ४० |
| | एकूण | ४० | १०० |

६ इतिहास प्रश्न पत्रिकेचा आराखडा :-

प्रश्न. १ वस्तुनिष्ठ प्रश्न :-

[अ] कंसातील योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा. [३]
प्रत्येकी १ गुण, एकूण ३ गुण

[तीन उपप्रश्न दिलेले असतात. प्रत्येक उप-प्रश्नास कमीत-कमी तीन पर्याय दिलेले असतात.]

[ब] जोडया लावा – प्रत्येकी १ गुण – [३]

[१] व्यक्ती – संस्था [२] व्यक्ती – कार्य.

[३] घटना – परिणाम / कारण

["अ" स्तंभ – ३ बाबी व "ब" स्तंभ – ५ बाबी]

[क] रकान्यातील रिकाम्या जागा भरा – प्रत्येकी १ गुण [२]

[१] संस्था – संस्थापक [२] राष्ट्र – नेता.

प्रश्न. २ <u>लघु-उत्तरी प्रश्न :-</u> [८]

[१] थोडक्यात उत्तरे लिहा – २/३ वाक्यांत उत्तर अपेक्षित असते. किमान दोन मुद्दे उत्तरात अपेक्षित.

[२] चार उपप्रश्न सोडवायचे असतात. प्रत्येकी २ गुण.

[३] एकूण सहा उपप्रश्न दिलेले असतात.

प्रश्न. ३ लघु-उत्तरी प्रश्न [ कारणे द्या. ] [८]

[१] एकूण चार कारणे सोडवायची असतात.

[२] प्रत्येक कारणास २ गुण असतात.

[३] एकूण ७ कारणे दिलेली असतात.

प्रश्न. ४ <u>दीर्घोत्तरी प्रश्न :-</u> [८]

[१] एकूण २ उपप्रश्न सोडवायचे असतात. प्रत्येकी ४ गुण

[२] एकूण ३ उपप्रश्न दिलेले असतात.

[३] प्रश्नांची उत्तरे निश्चित येण्यासाठी किमान दोन मुद्दे व लहान मुद्दे असल्यास जास्तीत जास्त ४ मुद्दे द्यावेत.

प्रश्न. ५ <u>दीर्घोत्तरी प्रश्न :-</u> [८]

[१] फक्त एकच प्रश्न सोडवायचा असतो.

[२] यासाठी एकूण ३ प्रश्न दिलेले असतात.

[३] उत्तर किमान १६ ओळी असावे.

[४] <u>प्रश्नांचे प्रकार</u> –

[अ] कारणे व परिणाम.

[ब] विधान स्पष्ट करणे.

[क] घटनांचे महत्व किंवा वैशिष्टये सांगणे.

३.७ एस.एस. सी. परीक्षा प्रश्न पत्रिका, एप्रील १९९०.

एस. एस. सी. परीक्षाची इतिहास विषयाची प्रश्न पत्रिका ही घटकानुसार आणि प्रश्न प्रकारानुसार गुण विभागणी विचारात घेऊन काढलेली असते. तिचा एक नमुना म्हणून एस. एस. सी. परीक्षा, एप्रील - १९९० ला इतिहासाची विचारलेली प्रश्न पत्रिका परिशिष्ट "ड" मध्ये दिली आहे. तिचा प्रस्तुत संशोधना संबंधी विचार केला गेला आहे.

३.५ मार्गदर्शक :-

पाठ्य पुस्तकाच्या पाठ्यांशावर आधारित पण एस. एस. सी. परीक्षेचे स्वरूप लक्षात घेऊन प्रश्नोत्तर रूपाने खाजगी प्रकाशकानी जी पुस्तके प्रकाशीत केली जातात त्यालाच मार्गदर्शक किंवा गाईड असे म्हटले जाते. 'पास होण्याचे' शिखर कसे गाठता येईल त्याबाबत वाट दाखविणारा अगर मार्गदर्शविणारा तो मार्गदर्शक [गाईड] असा या पुस्तकांचा रोख असतो.

अध्ययन-अध्यापनासाठी पाठ्यपुस्तका बरोबर मार्गदर्शकाचा वापर हा सर्रास होत आहे. पाठ्यपुस्तकातील घटक, पण प्रश्नोत्तर रूपाने मांडणी करुन परीक्षेचा साचा तयार पुरविणे हा दृष्टीकोन मार्गदर्शकात असतो. खाजगी प्रकाशकांनी ही निर्मिती केल्यामुळे त्याला धंद्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. धंद्याच्या यशस्वीते करिता जाहीरात बाजी, भडकपणा, प्रचार, प्रसार आणि सवलतीचे आमिष यासर्व बाबी मार्गदर्शकाच्या बाबतीत पण आल्या. बाजारातील स्पर्धेत टिकण्यासाठी हा सर्व खटाटोप करावाच लागतो.

मार्गदर्शक किंवा गाईडस यांची नांवे ही अधिक आकर्षक, अर्थवाही असतात. मुखपृष्ठा वरील ही नांवे सर्वांचे लक्ष वेधून न घेतील तरच नवल.

सुपर संभाव्य प्रश्न उत्तर, २१ अपेक्षित प्रश्न संच, बालचित्रा अपेक्षित प्रश्नोत्तरे, ROBIN संभाव्य प्रश्न उत्तरे, All in one, Most Likely questions, Super paper Solution, परीक्षा हॉल मधील सोबती, दोन दिवसात अभ्यास, इत्यादी नावीन्यपूर्ण नांवे मार्गदर्शकांना आहेत.

दैनंदिन जीवनाचा अविभाज्य अंग बनलेल्या दैनिक वर्तमान पत्रे ही याकामी मागे नाहीत. ताज्या बातम्या बरोबरच "दहावी मार्गदर्शन" हे सदर दहावीच्या मुलांना मार्गदर्शन म्हणून प्रश्नोत्तर स्वाने चालू केले आहे. "तरुण भारत", "केसरी", "ऐक्य" या दैनिकातून वर्षभर ही "दहावी मार्गदर्शन" सदरे चालू असतात. दहावीच्या मुलांना अभ्यासासाठी मार्गदर्शन म्हणून काही खास दिवाळी अंक ही गतवर्षी पासून निघत आहे.

मार्गदर्शक विद्यार्थी, अध्यापक, पालक या सर्वांना उपयुक्त वाटत आहेत. मार्गदर्शक हे एस. एस. सी. च्या अद्यावत परीक्षा पध्दतीवर आधारित असतात. एस. एस. सी. बोर्डाच्या पूर्वी होऊन गेलेल्या मार्च-एप्रिल आणि ऑक्टोबरच्या प्रश्न पत्रिका उत्तरासह सोडविलेल्या असतात. गुणदानाची घटकानुसार व प्रश्न प्रकारानुसार विभागणी त्यात असते. परीक्षासाठी संभाव्य असलेले सर्व प्रश्न त्यांच्या आदर्श उत्तरासह असतात. प्रत्येक प्रश्न संग्रहाच्या शेवटी सरावासाठी महत्वाचे अधिक प्रश्न दिलेले असतात. वार्षिक प्रश्न पत्रिकेचा मुद्देसूद आराखडा दिलेला असतो. कोणता प्रश्न कोणत्या वर्षी आला आहे, त्याचा उल्लेख प्रश्नाच्या शेवटी कंसात केलेला असतो. सरावासाठी महत्वाचे अधिक प्रश्न दिलेले असतात. एस. एस. सी. परीक्षेच्या दृष्टीने अपेक्षित असलेली सर्व प्रश्न आणि त्यांची आदर्श उत्तरे यांचाच केवळ त्यात समावेश असतो. थोडक्यांत एस. एस. सी.

परीक्षेच्या काळजीतून मुक्त होण्यासाठी मार्गदर्शिका असतात.

विद्यार्थ्यांना नेमके काय पाहिजे याचे परिपूर्ण ज्ञान हे अशा मार्गदर्शक निर्मितीमध्ये असते. विद्यार्थ्यांना आकर्षित करुन घेण्यासाठी वर्तमान पत्रात जाहीराती दिल्या जातात. पुस्तक दुकानात मार्गदर्शकांची आकर्षक मांडणी, आकर्षक पोस्टर्स, इयत्ता १० वी च्या प्रत्येक तुकडीत गुणानुक्रमे पहिले आलेल्या विद्यार्थ्यांना तसेच मुख्याध्यापक व विषय शिक्षक यांना मोफत संच देणे, शाळेच्या कार्यालयात आकर्षक पोस्टर्स लावणे, विद्यार्थ्यांना मार्गदर्शिकाची जाहीरात असलेली पुस्तकांची कव्हर्स तसेच वेळा-पत्रकासाठी छापील कार्डस मोफत वाटणे यासर्व मार्गाने मार्गदर्शकाचा प्रचार व प्रसार योजना पूर्वक मार्गदर्शक निर्मात्याकडून केला जातो.

## ३.६ समारोप :-

प्रस्तुत प्रकरणात समाजजीवन शास्त्र विषयाचे स्वरुप, त्यात अंतर्भूत होणारे विषय, त्याचा अभ्यासक्रम या अभ्यासक्रमावर तयार केलेले इयत्ता दहावीचे पाठ्यपुस्तक, इतिहास अध्यापनाच्या नवा दृष्टीकोन, सध्याची परीक्षा पध्दती, तिचे स्वरुप, इतिहासाची परीक्षा, इतिहासाच्या प्रश्न-पत्रिकेचा आराखडा आणि या सर्वांशी संबंधित मार्गदर्शिकाचे स्वरुप कसे असते यासर्व बाबींची सविस्तर चर्चा केली आहे. अशा प्रकारे या प्रकरणात प्रस्तुत शोध प्रबंधाला आवश्यक असलेली पार्श्वभूमी तयार केलेली आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी प्रकरण चार - संशोधन पध्दती, प्रकरण पांच - संकलित माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण आणि प्रकरण सहा - निष्कर्ष शिफारशी या प्रकरणाला आधारभूत ठरणारी आहे.

पुढील प्रकरण चार मध्ये प्रस्तुत शोध प्रबंधाची संशोधन पध्दती विस्तृतपणे विशद केली आहे.

--x--x--x--x--x--